Annexure-VII

**प्रकल्प प्रवर्तक मे. निर्मिती अस्मिता ॲग्रो प्रायव्हेट लिमिटेड यांचा गट क्रं, ४९९, बिरणवाडी, तालुका-तासगांव, जिल्हा-सांगली येथे सिंगल सुपर फॉस्फेट (एस.एस.पी.)-६००.० मे.टन/दिन व ग्रॅन्युलेटेड सिंगल सुपर फॉस्फेट (जी.एस.एस.पी.) - ४००.० मे.टन/दिन उत्पादन प्रकल्प स्थापन करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीचे इतिवृत.**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. निर्मिती अस्मिता ॲग्रो प्रायव्हेट लिमिटेड यांचा गट क्रं, ४९९, बिरणवाडी, तालुका-तासगांव, जिल्हा-सांगली (४१६ ३११), महाराष्ट्र, येथे सिंगल सुपर फॉस्फेट (एस.एस.पी.)- ६००.० मे.टन/दिन व ग्रॅन्युलेटेड सिंगल सुपर फॉस्फेट (जी.एस.एस.पी) - ४००.० मे.टन/दिन उत्पादन प्रकल्प स्थापन करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार, दिनांक १२ मे, २०२३ रोजी दुपारी ११.३० वाजता प्रकल्पस्थळावर घेण्यात आली.

श्री. नवनाथ सं. अवताडे, आयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली यांनी श्री विजयसिंह पाटील, अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अपर जिल्हादंडाधिकारी,सांगली, श्री जगन्नाथ साळुंखे, सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर, तहसिलदार तासगांव, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, तांत्रिक सल्लागार, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, विविध मेडीयांचे प्रतिनिधी व उपस्थित असलेल्या स्थानिक नागरीकांचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

प्रकल्प प्रवर्तक मे. निर्मिती अस्मिता ॲग्रो प्रायव्हेट लिमिटेड यांचा गट क्रं, ४९९, बिरणवाडी, तालुका-तासगांव, जिल्हा-सांगली, महाराष्ट्र, येथे सिंगल सुपर फॉस्फेट ( एस.एस.पी. )-६००.० मे.टन/दिन व ग्रॅन्युलेटेड सिंगल सुपर फॉस्फेट ( जी.एस.एस.पी )-४००.० मे.टन/दिन उत्पादन प्रकल्प स्थापन करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई येथे दिनांक ०६-०३-२०२३ रोजी अर्ज प्राप्त झाला होता.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित अधिसूचना नुसार संवर्ग ब ५ (ए) रासायनिक खते मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास राज्य पर्यावरण मुल्यांकन समिती, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी सदरहू प्रकल्पास राज्य पर्यावरण मुल्यांकन समिती, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची प्राथमिक मान्यता ( ToR ) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक ०७-१२-२०२२ रोजी सादर केला व सदर अर्जास दिनांक ०८ डिसेंबर, २०२२ रोजी ऑनलाईन मंजूरी प्रदान केली.

मा. जिल्हाधिकारी, सांगली यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी शुक्रवार, दिनांक १२ मे, २०२३ रोजी दुपारी ११. ३० वाजता घेण्यास मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना २००६ व सुधारित अधिसुचना २००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-३०/२०२३, व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२३०४२६-एफटीएस ०२५, दिनांक २६-०४-२०२३ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली त्यानुसार खालील प्रमाणे उपस्थिती होती.

१) मा. श्री. विजयसिंह पाटील, - **अध्यक्ष**
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, सांगली.
( प्रतिनिधी - मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, सांगली. )

२) मा. श्री. जगन्नाथ शं. साळुंखे, - **सदस्य**
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर.

३) मा. श्री. नवनाथ सं. अवताडे, - **आयोजक**
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली.

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर दिनांक ११-०४-२०२३ रोजी स्थानिक वृत्तपत्र "दैनिक सकाळ " यात मराठी व राष्ट्रीय वृत्तपत्र "टाईम्स ऑफ इंडिया" यात इंग्रजी भाषेमध्ये जाहिर सूचना प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्ताऐवज/कागदपत्रे लोकांच्या माहिती व अभ्यासा करीता खालील कार्यालयात उपलब्ध करुन देण्यांत आलेली होती.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली.

२. जिल्हा उदयोग केंद्र, उदयोगभवन, सांगली.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली.

४. क्षेत्रिय निदेशालय ( पुणे ) केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ, ( पर्यावरण, वन, एवं जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार ), सर्व्हे नं. ११०, धनकुडे मल्टीर्पपज हॉल, बानेर रोड, पुणे.

५. उप सचिव, पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई.

६. मा. सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ, (मुख्यालय), कल्पतरू पॉईंट, तिसरा मजला, सिनेप्लॅनेट समोर, सायन सर्कल, सायन पूर्व, मुंबई.

७. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, उदयोग भवन, कोल्हापूर.

८. तहसिल कार्यालय, तासगांव, ता. तासगांव, जि.सांगली.

९. ग्रामसेवक,ग्रामपंचायत बिरणवाडी, गौरगांव, श्रीरामनगर, शिंदेवाडी, बलगवडे, ता. तासगांव, जि. सांगली.

आज सुनावणी दिवसांपर्यंत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली यांचेकडे कोणत्याही प्रकारच्या लेखी स्परुपात काही आक्षेप, हरकती, सूचना प्राप्त झालेल्या नाहीत. तथापि आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या आज लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना / आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल राज्य पर्यावरण मुल्यांकन समिती, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, नविन प्रशासकीय इमारत, मुंबई - ४०० ०३२, यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण

मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पासाठी एकूण खर्च रुपये ३५.० कोटी खर्च येणार असून तर पर्यावरण व्यवस्थापनासाठी भांडवली खर्च १९०.० लाख रुपये तर आवर्ती खर्च रुपये ४०.० लाख आहे. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज म्हणजेच शून्य द्रव निःस्सारण प्रकल्प आहे.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**<u>उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक</u> जाहिर लोकसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढील प्रमाणे आहे-**

१) **श्री. हरिभाऊ खबाले, मुक्काम पोस्ट-बस्तवडे, तालुका-तासगांव, जिल्हा-सांगलीः-**

**प्रश्न-** प्रकल्पात उत्पन्न होणा-या सांडपाण्यावर काय प्रक्रिया व उपाययोजना करण्यात येतील?

**उत्तर-** प्रकल्प सल्लागार यांनी सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे प्रकल्प उत्पादन प्रक्रियेत पाण्याची गरज लागणार नाही. मात्र या उद्योगात जसे सल्फ्युरिक ॲसिड वापरले जाते, त्याच्या डायल्युशनसाठी १७१.० घनमीटर प्रति दिन (१ लाख ७१ हजार लीटर प्रतिदिन) ताजे पाणी लागेल. हे पाणी तयार होणारे गॅसेस शोषून घेण्यासाठी ( absorb ) लागते. त्यास स्क्रबर असे म्हणतात. ते पाणी पाच स्टेजच्या स्क्रबरमधून हायड्रो-क्लोरिक ॲसिड गॅस निर्माण होतो, तो स्क्रब केला जातो त्यासाठी पाणी लागते. ते परत वापरण्यात येते. म्हणजे ते पाणी पाण्यात किंवा जमिन मिसळ्याचा संभव नाही. हा प्रकल्प झिरो लिक्विड डिस्चार्ज म्हणजे शून्य द्रव निःस्सारण प्रकल्प आहे. प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही.

मात्र प्रकल्पात काम करणारे कामगार, टॉयलेटचे पाणी, प्रकल्पातील कॅन्टीन यामुळे सुमारे ९.० किलोलिटर प्रतिदिन म्हणजे ९,०००.० लीटर प्रति दिन घरगुती सांडपाणी निर्माण होईल. त्यावर प्रक्रिया करुन त्याचा पुनर्वापर प्रकल्पातील हरितपट्टा विकसनासाठी करण्यात येईल.

**यावर हरिभाऊ खबाले, मुक्काम पोस्ट-बस्तवडे** यांनी मत मांडले की ही आनंदाची गोष्ट आहे की परिसरात आमचे बस्तवडे हे गांव आहे. प्रस्तावित प्रकल्पात २५० कामगार/कर्मचारी यांची आवश्यकता आहे. त्यासाठी स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात यावे ही विनंती.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की येथे कार्यरत प्रकल्पात अभियंता संवर्गातील २-३ व्यक्ती तासगावाहून येतात, बाकी सर्व कामगार व कर्मचारी हे स्थानिक आहेत. ९०% पेक्षा जास्त स्थानिकांना प्रकल्पात रोजगाराची संधि देण्यात आलेली असून पुढेही भविष्यातील प्रकल्पात देण्यात येईल.

२) **सौ. उज्वला विजय भोसले, राहणार-बिरणवाडी, तालुका-तासगाव, जिल्हा-सांगलीः-**

**प्रश्न -** आम्ही प्रकल्पाच्या शेजारीच राहतो. प्रकल्पात उत्पादन प्रकियेसाठी कोणत इंधन (fuel) वापरण्यात येईल व त्यामुळे होणा-या प्रदूषण नियंत्रणासाठी काय उपाययोजना करण्यात येईल?

**उत्तर-** पर्यावरण सल्लागार यांनी मत मांडले की हा अत्यंत समर्पक प्रश्न विचारण्यात आलेला आहे. महिला असल्याने इंधनामुळे काय त्रास होऊ शकतो याची आपणास कल्पना आहे. येथे इंधनाची मात्रा व क्षमता ही जास्त नाही, हे बरोबर आहे. प्रकल्पात Agriculture Waste त्यास Bio-Waste म्हणजे शेतात जे अनुपयोगी पदार्थ ज्याची विल्हेवाट लावावी लागते, ते ब्रिकेट्स इंधन म्हणून वापरण्यात येतील. ते सिंगल सुपर फॉस्फेट ग्रॅन्युलेटेड (दाणेदार) सिंगल सुपर फॉस्फेट तयार करण्यासाठी एक भट्टी (फर्नेस) असते, त्यामध्ये ते वापरण्यात येतील. धुर फिल्टर करण्यासाठी डस्ट कलेक्टर नावाचे उपकरण असते, ते बसविण्यात येईल. त्यामुळे बाहेर पडणारा धुर स्वच्छ (Clean Air) बाहेर पडेल. त्याची मात्राही बरीच कमी असल्याने बराच वेळा न दिसणारा धूर बाहेर पडेल.

३) **श्री इंद्रजीत पाटील, राहणार-बस्तवडे, तालुका-तासगाव, जिल्हा-सांगलीः-**

**प्रश्न-** पावसाच्या पाण्याचे साठवण करण्याबाबत नियोजन कसे करण्यात आलेले आहे?

**उत्तर-** पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पाऊस येथे ठराविक दिवसात पडतो. पावसाचे पाणी वाहुन जाऊ नये म्हणून संपूर्ण प्रकल्पातील गट क्रमांकातील स्लोपचा अभ्यास करण्यात आलेला आहे. त्यानुसार संपूर्ण ड्रेनज पॅटर्न बनवून रेन वॉटर हार्व्हेस्टींग पीट्स बनविण्यात येतील. त्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी ही कमी न होण्यास

किंबहुना वाढविण्यास निश्चितच मदत होईल. त्यासाठी आवश्यक असलेला खर्चाची तरतुद व आरेखन (design) याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

४) **<u>श्री शुभम पाटील,राहणार-बिरणवाडी, तालुका-तासगाव, जिल्हा-सांगलीः-</u>**

**प्रश्न-** आपण दाखविलेले सादरीकरण हे छान आहे. आमची येथे शेजारीच जमिन आहे. तर हरितपट्टा विकासासाठी परिसरात कोणती झाडे लावण्यात येतील, जेणेकरुन येथील पर्यावरणाचे संवर्धनास मदत होईल.

**उत्तर-** पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर देताना सांगितले की अतिशय चांगला प्रश्न विचारण्यात आलेला आहे. तुमची जमिन शेजारीच असल्याने आपणास कुठली झाडे लावण्यात येतील याबाबतची उत्सुकता असणे हे अगदीच योग्य आहे. तर येथे जी झाडे रुजू व वाढू शकतात, तीच झाडे लावण्यात येतील. या विषयात आमच्या संस्थेतील हरितपट्टा विकसनातील तज्ज्ञ व्यक्तींकडून कुठली झाडे लावण्यात येतील ही यादी तयार करुन शासनास सादर करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे स्थानिक वन विभागाच्या मार्गदर्शनाखाली अशी झाडे लावण्यात येतील की जे बाराही महिने सावली व फुले देतात. प्रकल्प परिसरातच ही झाडे लावण्यात येतील. ३३% हरितपट्टा विकसित करणे हे बंधनकारकच आहे.

तदनंतर श्री शुभम पाटील यांनी झाडांची नावे सांगण्याची सूचना केली. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सदरहू झाडांची नांवे ही शास्त्रीय असल्याने येथील स्थानिकांना समजणार नाहीत. सदरहू वृक्षांची यादी ही वनविभागास व शासनास कळविली असून स्थानिकांच्या काही सूचना असल्यास त्या वृक्षांच्या नावाचा यादीत समावेश करण्यात येईल. येथील वड, पिंपळ, नीम, गुलमोहोर अशा झाडांचा यादीत समावेश आहे.

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी विनंती केली की जर स्थानीकांचे काही सूचना, आक्षेप नसल्यास कृपया पुढील कार्यवाही करण्यात यावी.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी आणखी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता. आयोजक यांनी सदस्य पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना काही सूचना असल्यास त्या व्यक्त करण्याची विनंती केली.

**मा. श्री जगन्नाथ साळुंखे, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-**

मा. सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती_यांनी सांगितले की लोकांसाठी प्रश्न प्रकल्प प्रवर्तकांना विचारण्यात येत आहे की प्रकल्प उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल (raw material) $H_2SO_4$ हे कोठून आणण्यात येणार आहे? ते किती प्रमाणात (quantity) आणण्यात येईल.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की उत्पादनासाठी दोन प्रकारचा कच्चा माल लागणारा आहे. रॉक फॉस्फेट लागते, ते आयात करण्यात येते. तर सल्फ्युरिक ॲसिड हे राजस्थान, गुजरात पासून ते महाराष्ट्र या सर्व ठिकाणी याची निर्मिती होत असते. ते सल्फर या कच्चा मालापासून तयार होते. त्यामुळे ते रस्ता वाहतुकीव्दारे प्रकल्पात आणण्यात येईल.

मा. सदस्य यांनी ९८% ते वापरावे लागेल तर डायल्युशन करणार आहात का याबाबत विचारणा केली असता, पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ७०% पर्यत त्याचे डायलुशन करण्यात येईल. सदस्य यांनी सल्फ्युरिक ॲसिड आणणा-या टॅंकर्सना जीपीएस सिस्टिम असणार का व त्यामध्ये स्थानिक लोकांचे टॅंकर्स असतील काय याबाबत विचारणा केली.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की स्थानिक लोकांचे टॅंकर्स जर सुसज्ज व संबंधित विभागाची परवानगी घेतली असले, तर ते नक्कीच असतील.

मा. सदस्य यांनी असे मत नोंदविले की ज्यांनी घातक रासयनिक पदार्थ हाताळणी व वाहतुकीची परवानगी घेतली असल्यास त्यांना संधी देणे आवश्यक आहे. त्यासाठी स्थानिकांमध्ये जागृती निर्माण करावी लागेल. कारण ही व्यवसायाची संधीही स्थानिकांना मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना घातक रासयनिक हाताळणी व वाहतुकीची परवानगी बाबत माहिती द्यावीच लागेल. पर्यावरण सल्लागार यांनी मत मांडले की यात कारखाना व स्थानीक लोक या दोघांचाही फायदा आहे.

मा. सदस्य यांनी सांगीतले की हे केमिकल आहे. स्थानिकांना जर घातक रसायन हाताळणी व साठवण याबाबत माहिती नसेल तर प्रकल्प प्रशासनास विशेष काळजी घ्यावी लागेल.

मा. सदस्य, यांनी विचारले की आपण हायड्रो-क्लोरो सल्फ्युरिक एसिड याचे वेस्ट उत्पन्न करणार आहात. त्याची विल्हेवाट कशी लावण्यात येणार याबाबत माहिती देण्यात यावी.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांना माहिती दिली की प्रकल्पात वेस्ट - हायड्रो-क्लोरो सल्फ्युरिक एसिड निर्माण होते, ते स्क्रबर वेस्टच्या स्वरुपात निर्माण होते. विशिष्ट वेळेनंतर स्क्रबर वेस्ट वॉटरला पुनर्वापर करु शकत नाही, त्यावेळी ते ड्रेन करावे लागते. ते ड्रेन करुन दोन प्रकारे

वापरु शकतो. एक व्हल्यु एडिशन करणे व दुसरे एसएसपी फॉर्म गरम असतो तो थंड करण्यासाठी त्यावर स्प्रे करावे लागते.

मा. सदस्य यांनी सांगितले की उपस्थित काही महिलांनी सांगितले की त्या प्रकल्पाजवळच राहतात. म्हणजे कामगारांच्या बरोबरच शेजारील राहणा-या लोकांचीही काळजी घेणे आवश्यक आहे. कारण ते हायड्रो-क्लोरो हे अँसिडीक आहे. कारण ते धोकादायक आहे. त्याचा स्प्रे आपण ओपन जागेत करणार आहात. त्याची पूर्णपणे काळजी प्रकल्प प्रशासनाने घेणे आवश्यक आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी काळजी व योग्य ती खबरदारी घेण्याचे अभिवचन दिले त्यांनी सांगितले की स्प्रे हे सेमी अँटोमेटिक असते, वीज गेली तर बॅटरीवर चालते. मा. सदस्य यांनी सांगितले की स्थानीक जनतेस धोका होता कामा नये.

मा. सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्पात आपण २०० कामगार घेणार आहात, ते स्थानिकच असले पाहिजे, त्याशिवाय त्यांना घातक रसायन हाताळणी, साठवण, वापर, विल्हेवाट याबाबत प्रशिक्षण, जागृती व काळजी घेण्यास सांगण्यात यावे. त्याचप्रमाणे जर अपघात झाल्यास, पुढील उपाययोजनेबाबतही कामगार, कर्मचारी यांना सक्षम करणे जरुरीचे आहे. त्यासाठी प्रशिक्षण, वेळोवेळी रंगीत तालीम घेणे कंपनी प्रशासनाने करावे ही विनंती.

पर्यावरण सल्लगार यांनी सांगितले की घातक रसायन हाताळणी, साठवण, वापर, विल्हेवाट यासाठी प्रकल्पात विशेष प्रशिक्षण व्यवस्था निर्माण करण्यात येईल.

मा. सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी विचारणा केली की प्रस्तावित प्रकल्पात आपण २०० लोकांना रोजगाराची संधी देणार आहेत, तर स्थानिक जनतेस या प्रकल्पाचा काय फायदा होणार आहे? तसेच उत्पादनात उत्पन्न होणारा पदार्थ आणि उप-पदार्थ (Product & Bye-Product) याचा फायदा स्थानिकांना होईल काय याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितेल प्रत्यक्ष फायदा म्हणजे येथे रोजगाराची संधी मिळेल. त्याचप्रमाणे बैठकीत सदस्य यांनी खूपच चांगली सूचना केल्याप्रमाणे स्थानिकांचे टँकर्स जर सुसज्ज (well equipped) व संबंधित शासकीय विभागांची मान्यता घेतलेले असतील तर त्यांना संधि देण्यात येईल. त्याचप्रमाणे या प्रकल्पामुळे स्थानिक व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल, त्याचाही फायदा स्थानिकांना होणारच आहे.

मा. सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्पाचा फायदा हा स्थानिकांना होणे गरजेचे आहे. त्याबाबत अध्यक्ष, आपणास सूचना करतील.

त्याचप्रमाणे प्रकल्पात उत्पन्न होणारे पदार्थ आणि उप-पदार्थ (Product & Bye-Product) हे आपण आपल्या राज्यात व इतर राज्यात विक्री करणार आहात. तर याचा फायदा स्थानिकांना होणे हे गरजेचे आहे. कारण स्थानिकांच्या सहकार्याने हा प्रकल्प उभा राहणार आहे. स्थानिक शेतक-यांना कमी दरात खत उपलब्ध करणे हा जरी प्रकल्प प्रशासनाचा विषय असला, तरी त्याबाबत स्थानिक जनतेचे हित सांभाळणे योग्य होईल.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की स्थानिक शेतक-यांची खताची गरज प्रथम भागविण्यात येईल. त्याचबरोबर मा. सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी केलेल्या महत्वपूर्ण सूचनांचे पालन करण्याचे आश्वासन दिले.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मा. सदस्य, यांनी केलेल्या महत्वपूर्ण सूचना प्रकल्पाच्या नियोजनात समावेश कराव्यात अशी सूचना केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना मनोगत व सूचना असल्यास त्या व्यक्त करण्याची विनंती केली.

**<u>मा. श्री विजयसिंह पाटील, अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती.</u>**

मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्वांचे स्वागत करुन बैठकीत सूचना, आक्षेप नोंदविताना स्थानिक महिला, महाविद्यालयात जाणा-या तरुणांनीही प्रश्न, सूचना मांडल्या, यावरुन त्यांची प्रस्तावित प्रकल्पा विषयीच्या भावना कळल्या. मा. अध्यक्ष यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पात ३५ कोटींची गुंतवणूक करण्यात येणार आहे. ब-याच वेळा गुंतवणूक जास्त, पण रोजगार कमी प्रमाणात असतो. एक व्यक्तीच्या रोजगारासाठी एक कोटीची गुंतवणूक अपेक्षित असते. या प्रकल्पात २५० लोकांना प्रत्यक्ष रोजगार व स्थानिक व्यवसायात अप्रत्यक्ष वाढ म्हणजे ५०० व्यक्तींना याचा फायदा होणार आहे. जर ५०० कुटुंबांना फायदा होणार, म्हणजे साधारणतः दोन हजार लोकांना या प्रकल्पाचा फायदा होणार आहे.

मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत सदस्य यांनी केलेल्या सूचनांनुसार प्रकल्पात ९०% रोजगाराची संधी ही स्थानिकांना देण्यात यावी याबाबत प्रकल्प प्रशासनाने दक्ष राहणे हे आवश्यक आहे. मा. अध्यक्ष यांनी मत मांडले की सदरहू रोजगार हा अकुशल संवर्ग न ठेवता प्रकल्पात जेथेजेथे कुशल संवर्गातील व्यक्तींची गरज आहे, तेथेही स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात यावे.

मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित स्थानिक तरुण-तरुणींना सूचना केली प्रकल्पात ज्या कुशलतेची (Skill) आवश्यकता आहे, ती आपण आत्मसात करण्याची गरज आहे. मा. अध्यक्ष यांनी येथे कुठल्या टेड्रच्या अभियंत्यांची प्रकल्पात गरज आहे याबाबत विचारणा केली. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्प स्थापन करताना सिव्हिल, मेकॅनीकल व इलेक्ट्रीक डिप्लोमा/डिग्री इंजिनियर्सची गरज आहे, नंतर प्रकल्प सुरु झाल्यानंतर केमिकल, इलेक्ट्रीक डिप्लोमा/डिग्री इंजिनियर्सची आवश्यकता आहे. मा. अध्यक्षांनी प्रकल्प प्रवर्तकांना भविष्यात लागणारे इंजिनियर्स स्थानिक घेण्याची सूचना केली.

मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी विचारणा केली की प्रस्तावित प्रकल्पास १८१.० केएलपीडी पाण्याची गरज आहे. तर त्यासाठी पाण्याच स्त्रोत कुठला आहे?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की पाण्याचा स्त्रोत हा भूगर्भातील पाणी घेण्यात येणार आहे. त्यासाठी आवश्यक असणार केंद्र सरकारच्या Central Ground Water Authority (CGWA) ची परवानगीसाठी अर्ज करण्यात आलेला आहे.

मा. अध्यक्ष यांनी पाणी पुनर्वापरबाबत काही नियोजन असल्यास त्याचे स्पष्टीकरण देण्याची सूचना केली.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की १८१.० केएलपीडीत पाण्यातील काही पाण्याचा पुनर्वापर करण्यात येणार आहे. प्रकल्पात जे घरगुती सांडपाणी उत्पन्न होईल, त्याचा पुनर्वापर करण्यात येणार आहे. प्रोसेसमध्ये जे स्क्रबर ५-६ ठिकाणी लावण्यात येतात, तेथे जो प्रोसेस लॉस आहे, तो १७१.० केएलपीडी आहे.

मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी विचारणा केली की प्रकल्पाचे एकूण क्षेत्र हे ५ एकरपेक्षा जास्त आहे. त्याच्या ३३% म्हणजे साधारणतः ७,०००.० चौरस मीटर होईल. हे क्षेत्र प्रकल्पास हरितपट्टा विकसनासाठी राखीव ठेवावा लागेल. बैठकीत सूचना करण्यात आल्यानुसार अहवालात झाडांची नांवे ही बोटॅनिकल नावे दिलेली आहेत. तरी स्थानिकांना समजण्यासाठी त्या झाडांची प्रचलीत मराठी नावे, ग्रामीण भागात प्रचलीत नावांची यादी स्थानिकांना उपलब्ध करुन देण्यात यावी. स्थानिकांनी हरितपट्टा विकसनाबाबत करणा-या सूचना, आक्षेप यांची नोंद पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात घेण्यात यावी. हा डोंगराळ खडकाळ भाग असून येथे पावणे दोन एकर हरित पट्टा विकसित करणे जिकरीचे आहे. मात्र ते करणे गरजेचे आहे. कारण प्रकल्प जरी झेडएलडी प्रकल्प असला, तरी हवेचे व ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी हरितपट्टा विकसित करण्यात यावा. त्यामुळे प्रकल्प स्थापनेपूर्वी प्रथम काम हरितपट्टा विकसित करण्याचा आहे.

मा. अध्यक्ष यांनी इमारतीच्या बिल्टअप क्षेत्रात किती वाढ होईल याबाबत विचारणा केली. जर वाढ होणार, तर त्याअगोदर हरितपट्टा विकसित करण्याचे काम हाती घेण्यात यावे. कारण जून महिन्यात हरितपट्टा विकसित केल्यास त्याचा फायदा त्यामुळे होईल.

मा. अध्यक्ष यांनी सांगितले की प्रकल्पाने पर्यावरण व्यवस्थापन योजनेसाठी (Environment Management Plan-EMP) २.२५ कोटी तरतुद केलेली आहे. यात कमतरता होऊ नये. अतिरिक्त तरतुदीची गरज लागल्यास ती करण्यात यावी.

मा. अध्यक्ष यांनी सांगितले की सीएसआर निधीसाठी ७० लाख राखीव ठेवल्याचे अहवालात नमुद आहे. त्यात शाळांसाठी सोलर पॅनेलसाठी २५ लाखांची तरतुद करण्यात आलेली दिसते. तर त्याची गरज आहे काय ? कारण जी सामान्य जनतेची गरज आहे, ते पुरविणे आवश्यक आहे. तरी लोकांच्या गरजा लक्षात घेऊन त्याप्रमाणे सीएसआर ७० लाख निधी खर्च करण्यात यावा व शाळांच्या सोलर पॅनलबाबत पुनर्विचार करण्यात यावा.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की सर्वेक्षण करताना शाळेची मागणी व सीएससी समितीतील चर्चेनुसारच सोलर पॅनेलची तरतुद करण्यात आली आहे.

मा. अध्यक्ष यांनी सांगितले की सोलर पॅनेलसाठी २५ लाख, रुग्णवाहिकेसाठी वीस लाख, तर जवळच्या क्षेत्रामध्ये निसर्गरम्य विकासासासाठी पंचवीस लाख रुपये राखीव ठेवलेले आहेत. मा. अध्यक्ष यांनी मत मांडले की जेथे कुठल्याही बागा नसतील तेथे विरुंगळ्यासाठी बागा तयार करावयाच्या आहेत. तर आपण खर्च कसा करणार आहात?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की येथील ग्रामपंचायतीशी चर्चा करून त्याबाबत पुढील निर्णय घेण्यात येईल.

मा. अध्यक्ष यांनी मत मांडले की ग्रामपंचायत फक्त मंदिराचाच विकास सांगते.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की १० कि.मी. परिघातील बागा पाहून ग्रामपंचायतीच्या सहकार्याने पुढील कार्यवाही करता येऊ शकेल.

मा. अध्यक्ष यांनी सीएसआर निधी खर्च करताना लोकांचा सहभाग घेऊनच खर्च करण्यात यावा ही सूचना केली. मा. अध्यक्ष यांनी स्थानिकांनी बैठकीत जसा सहभाग घेतला, तसाच सहभाग स्थानिकांनी विकासकामांसाठी घ्यावा, त्याचप्रमाणे प्रकल्पास आवश्यक असणारे कौशल्य स्थानिक तरुण-तरुणींनी आत्मसात करावे अशी सूचना केली.

मा. अध्यक्ष यांनी प्रकल्प प्रशासनास सूचना केली की प्रकल्पात जे कौशल्य पाहिजे, त्याबाबत स्थानिकांना, ग्रामपंचायत कार्यालयांना अवगत करण्यात यावे.

मा. अध्यक्ष यांनी उपस्थितांचे आभार मानले व त्यांना आवाहन केले की प्रस्तावित प्रकल्पाविषयी आणखी काही पर्यावरणीय सूचना, विचार, आक्षेप असल्यास त्या नोंदवाव्यात. त्यास प्रकल्प प्रवर्तक, पर्यावरण सल्लागार स्पष्टीकरण देतील.

आयोजक, यांनी सांगितले की मा. अध्यक्ष यांनी औद्योगिक शाश्वत विकास साधताना तो कसा शाश्वत व पर्यावरण पुरक असावा, स्थानिकांचे प्रश्न कसे विचारात घ्यावेत, तो विकास करताना सामाजिक बांधिलकी जपताना प्रकल्प प्रवर्तकांनी काय करावे याबाबत महत्वपूर्ण मार्गदर्शन केले आहे. तसेच प्रकल्प स्थळाच्या चारी बाजूस उजाड डोंगर आहेत, तर प्रकल्प प्रवर्तकांनी सामाजीक बांधिलकी लक्षात घेऊन जनतेच्या सहभागाने हरित पट्टा विकसित करावा ही अपेक्षा मा. अध्यक्षांनी व्यक्त केलेली आहे. अत्यंत सखोल आणि सविस्तर असे हे पर्यावरण जनसुनावणीचे काम चालू आहे. मा. अध्यक्षांच्या सूचनेने सर्वांना परत पाच मिनिटांची वेळ सूचना, आक्षेप, तोंडी व लेखी स्वरुपात मांडण्यासाठी देण्यात आली तथापि उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद आला नाही.

आयोजक, यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीचे मा. अध्यक्ष, मा. सदस्य तसेच सर्व उपस्थितांचे, प्रकल्प प्रशासनाचे, शासकीय अधिकारी, पोलिस प्रशासन, पत्रकार यांचे आभार मानले व मा. अध्यक्षांच्या परवानगीने जनसुनावणी संपल्याचे घोषित केले.

सुनावणीची कार्यवाही सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी ०२.३० वाजता समाप्त झाली.

(नवनाथ सं. अवताडे)
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली

(जगन्नाथ शं. साळुंखे)
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर

(विजयसिंह पाटील)
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा अपर जिल्हादंडाधिकारी, सांगली.